# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १४/०७/२००४

आज दि. १४/०७/२००४ रोजी सकाळी ११.२५ वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. ०२ दि. ०५/०७/२००४ रोजीच्या विषय पत्रिकेवर विचार विनीमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोजफ | सभापती |
| ३) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ४) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ५) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ६) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | गटनेता |
| ७) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ८) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| ९) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १०) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ११) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १२) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १३) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १४) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १५) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १६) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १७) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १८) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १९) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २०) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २१) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २२) | श्री. पाटील रोहिदास शंकर | गटनेता |
| २३) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २४) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २६) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २७) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| २८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २९) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३०) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३१) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३२) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| ३३) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | गटनेता |
| ३४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३५) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३६) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३७) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३८) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३९) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ४०) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ४१) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ४२) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ४३) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४४) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ४५) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | गटनेता |
| ४६) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४७) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४८) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४९) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ५०) | श्री. मेंडोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ५१) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ५२) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ५३) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५४) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ५५) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५६) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५७) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५८) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५९) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ६०) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ६१) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ६२) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ६३) | श्री. पाटील ध्रुवकिशोर | सदस्य |
| ६४) | श्रीम. चेनसिंह नरावत भवरीकुंवर | सदस्या |
| ६५) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६६) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६७) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६८) | श्री. पाटील मोहन मधुकर | सदस्य |
| ६९) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ७०) | श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण | सदस्य |
| ७१) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ७२) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ७३) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ७४) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ७५) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७६) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७७) | श्री. पाटील मिलन गोंविंदराव | सदस्य |
| ७८) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ७९) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ८०) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ८१) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ८२) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ८३) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

वरील प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांस सांगितले. त्यानुसार वंदेमातरम् या राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार, मा. आयुक्त, विरोधी पक्षनेते, सभापती, उपआयुक्त व सर्व उपस्थित सदस्य, मनपा अधिकारी व पत्रकार बंधु आपले सर्वांचे स्वागत. सचिव साहेबांनी निवडणुकीचे कामकाज सुरु करावे. आज प्रश्नोत्तराचा तास होणार नाही तर आपण पुढच्या सभेत घेऊ या.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १६ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, मला तहकुबीची सुचना मांडायची आहे.

**मा. महापौर :-**

निवडणुकीचा कार्यक्रम आता सुरु करण्यांत येत आहे. तेव्हा सभा तहकुब करण्यांत येणार नाही.

**जयंत पाटील :-**

मॅडम, मला तहकुब करता येत नाही असा नियम दाखवा. नाहीतर मी आपल्याला नियम दाखवतो. त्या नियमानुसार करु शकतो. आपण मला चर्चा करण्याची संधी द्यावी.

**प्र. सचिव :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) महापालिकेतील पोटकलम ( ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेत जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीत नवीन सदस्यांची नेमणुक करावी या कारणामुळे सभा तहकुब करता येणार नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्ही तो नियम सांगितला. पण तहकुब करता येणार नाही. माझा प्रश्न असा आहे की, आपण मला या सभेमध्ये चर्चा करण्यासाठी पाच मिनिटे द्यावीत. माझा काय विषय आहे. आपण तो ऐकून घ्या. त्याच्यानंतर आपण निर्णय घ्या. आजच्या सभेमध्ये पत्रकारांनी बहिष्कार टाकलेला आहे. पत्रकारांना आपण मागच्या वेळेला काही आश्वासन दिले असेल. मला माहिती नाही. परंतु, सभेच्या नियमाप्रमाणे ज्या सभेमध्ये प्रेक्षकगृहामध्ये आपण प्रेक्षकांना बसवतो आणि जी सभा की, ज्या सभेमध्ये संरक्षणाच्या दृष्टिने किंवा गुप्ततेच्या दृष्टीने जी बाब आवश्यक नाही आहे. त्या सभेमध्ये पत्रकारांना बसविण्याचा हक्क आहे आणि हा त्यांचा अधिकार आहे. तेव्हा आपण पत्रकारांना या सभेमध्ये बसवावे आणि त्याच्यानंतर आपण ही सभा चालू करावी अशी मी आपल्याला विनंती करतो. जेव्हा प्रेक्षकांना हजर राहण्याचा अधिकार असतो तेव्हा वृत्तपत्राच्या बातमीदारालाही मिळतो व सभेतील वृत्तांत प्रसिद्ध करण्याचा अधिकार या परिस्थितीत प्राप्त होतो. आपल्या सभेतील ज्या ज्या काही बातम्या आहेत. ज्या ज्या काही इकडे गोष्टी होणार आहेत. त्या सभेचे वृत्तांन्त जनतेला कळले पाहिजे. लोकांना कळले पाहिजे आणि वर्तमानपत्रात आले पाहिजे. त्या दृष्टीने पत्रकारांना या सभेमध्ये बसविण्याची आपण व्यवस्था ताबडतोब करावी आणि त्याच्यानंतर ही सभा चालू करावी अशी माझी आपल्याला सुचना आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांनी पत्रकारांना आणि जनतेलासुद्धा सभागृहामध्ये सभागृहाचे कामकाज पाहण्याच्या दृष्टीकोनातून आणि लोकप्रतिनिधींचे विचार, प्रशासनाची भुमिका वगैरे ऐकण्याची संधी मिळावी असे स्तुत्य विचार मांडलेले आहेत. त्याच्याशी हे सभागृह असहमत आहे असे होणार नाही. हा प्रश्न राहिलेला आहे की, पत्रकार मंडळीच्यासाठी ह्यापुर्वी ह्या महापालिकेने चांगली व्यवस्था केलेली होती. परंतु, जेव्हा शहर विकास आघाडीच्या सदस्यांच्या आसनाचा प्रश्न आला त्यावेळी सभागृहाच्या रचनेमध्ये थोडा बदल करावा लागला आणि तो बदल करीत असताना प्रशासनाच्याच मार्गदर्शनाखाली आणि त्यांनी सुचविलेल्या सल्ल्याप्रमाणे ह्या सभागृहाची रचना करण्याच्या संदर्भामध्ये मा. गिरिष प्रधान आपले स्थापत्यकार, त्यांचासुद्धा सल्ला यावेळी घेण्यांत आला आणि असे की, यापुढे जागा देण्यांत आल्या. त्यामुळे जे अधिकारी समोर बसत होते. त्यांना जागा कमी पडायला लागली म्हणून आपण एक सामोपचाराचा भाग म्हणून दोन भाग पाडून त्या ठिकाणी एका बाजूला अधिकारी आणि दुसऱ्या बाजूला पत्रकार बंधु अशा स्वरुपाची मागच्या सभेच्या वेळी आपण सोय केली होती. त्यावेळीसुद्धा पत्रकारांनी बहिष्कार

घातला. त्यांनी त्यांचा रोष व्यक्त केला आणि त्यानंतर सभागृहामध्ये असे काही निश्चित झाले नाही की, त्यांना प्रेक्षकांच्या गॅलरीत बसण्याची संधी द्यावी. मा. तत्कालीन उपमहापौर त्यांनी पिठासिन अधिकारी म्हणून हे सभागृह सोडून गेल्यानंतर त्यांनी त्यांना आश्वासित केले. त्याबद्दल अद्यापी महापौरांकडे कोणताही प्रस्ताव आलेला नसल्यामुळे आजच्या सभेपुरता तरी पत्रकार मंडळींना बहिष्कार मागे घेऊन त्यांना जी काही जागा दिलेली आहे ती या शहराचे एक सामंजस्य या आजच्या सभेच्या कामकाजाचे महत्व हे सगळे लक्षात घेऊन त्यांनी सहकार्य करावे अशी सन्मा. सदस्य जयंत पाटील यांच्या वतीनेदेखील मी पत्रकार मंडळींना विनंती करतो. पत्रकार मंडळींनी त्यांनी दिलेल्या जागेवर बसावे असे मी सुचवित आहे आणि आपला सभा तहकुबीचा वगैरे विषय या ठिकाणी घेऊ नये अशी मी सभागृहाच्या वतीने सन्मा. सदस्य जयंत पाटील यांना विनंती करतो.

**जयंत पाटील :-**

असा प्रश्न आहे की, मी तहकुबीची सुचना प्रशासनाकडे मांडलेली आहे, पिठासीन अधिकाऱ्यांकडे मांडलेली आहे आणि त्याचे उत्तर सभागृह नेते देत आहेत. तिकडे पत्रकारांनी कुठे बसावे हा निर्णय कोण घेणार आहे? प्रशासन घेणार आहे किंवा महापौर मॅडम घेणार आहेत. मला त्यांच्याकडून उत्तर द्यावे. त्यांनी उत्तर द्यावे किंवा आयुक्तांनी उत्तर द्यावे आणि माझी योग्य सुचना आहे की, तुम्ही त्यांना मानाने बोलवा. त्यांच्याशी चर्चा करा. पाच-दहा मिनिटे उशीर होईल. त्यांना बसवा आणि मला वाटते माझ्या मताशी कोणी असहमत असण्याचे कारण नाही.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब मागच्या सभेमध्ये पिठासीन अधिकारी म्हणून मा. महापौर मॅडम ह्या परदेशवारीवर होत्या आणि त्यामुळे सन्मा. तत्कालीन उपमहापौर मुझफ्फर हुसेन साहेब हे पिठासीन अधिकारी होते आणि त्यावेळेला पत्रकारांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. थोडा सभागृहाच्या बैठकीच्या संरचनेत बदल झाला आणि मग जे अधिकारी पुढे बसायचे, आज जी ही बैठक चालली आहे, या ठिकाणी जे अधिकारी बसायचे त्याऐवजी अधिकाऱ्यांना तांत्रिक सल्लागारांच्या सल्ल्यानेच मागे अधिकाऱ्यांना बसविण्यांत आले आणि मग मागच्या सभेमध्ये पत्रकारांनी हा प्रश्न उपस्थित केला की, आम्हाला बसण्यासाठी गॅलरीमध्ये जी जागा होती ती जागा अपुरी आहे आणि याबाबत त्यावेळेला पिठासीन अधिकाऱ्यांकडे जेव्हा पत्र आले तर आयुक्त साहेबांशी चर्चा करुन असे ठरविण्यांत आले होते की, याबाबत योग्य तो तोडगा काढावा आणि या तोडग्याबाबत काल हे पत्र आल्यानंतर पुन्हा आयुक्त साहेबांशी मी स्वतः देखील चर्चा केली होती आणि आयुक्त साहेबांनी त्या वेळेला सांगितले होते की, काहीतरी तोडगा काढू. परंतु प्राप्त परिस्थितीमध्ये जी सभागृहाची रचना आहे. त्याच्यात विशेष काही बदल करता येईल अशी परिस्थिती नाही तर त्याबाबत आपण एकदा पुनःश्च पत्रकारांना आयुक्त साहेब आणि महापौर मॅडमनी एकत्र घेऊन बसावे आणि त्यांच्याशी चर्चा करुन यातून काय मार्ग निघतो तो पहावा आणि सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी जी सुचना केलेली आहे. कारण या सभागृहाच्या माध्यमातून या शहराच्या विकासासाठी विविध निर्णय घेतले जातात आणि या निर्णयाचे वृत्तसंकलन झाले पाहिजे. ही गरज आहे आणि त्यामुळे पत्रकारांनी बहिष्कार टाकणे ही चुकीची बाब आहे. तर त्या समस्यांवर आपल्याला काय तोडगा काढता येईल? यासाठी आपण पत्रकारांशी या सभेनंतर बोलावे किंवा आपण योग्य वेळ काढून त्यांना वेळ देऊन या विषयात चर्चा करावी.

**मोहन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, सध्या चालू असलेल्या सभेत सभेचे कामकाज चालू करण्यापुर्वी सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी या ठिकाणी एक तहकुबीची सुचना मांडली. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी यांनी याच्यामध्ये सहभाग घेतला. पत्रकार महोदय, या सभेचे वृत्तसंचलन किंवा अन्य मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकासाच्या दृष्टीकोनातून जे काही आपल्या वृत्ताद्वारे द्यायला पाहिजे अशी अपेक्षा आपल्या शहराला नेहमी भासते आणि आवश्यकता आहेच. परंतु, आजची सभा सुरु झाल्यानंतर जो मुद्दा सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी आपल्याकडे मांडलेला आहे त्या विषयी मागच्या वेळेला तत्कालीन उपमहापौर मुझफ्फर हुसेनजी पिठासीन अधिकारी होते. त्यांनी त्या पत्रकार महोदयांना आश्वासित केले असे आम्हांला समजले. परंतु, कुठेही कागदोपत्री त्याचा उल्लेख झाला नाही आहे आणि कुठेही त्याविषयी अशी बैठक महापौरांकडे झालेली नाही आहे. पत्रकार महोदयांचा जो आपल्याला आदर आहे तो आदर सर्वांनी ठेवला पाहिजे. त्याचा आदर आम्हीही ठेवतो. या सभागृहानेदेखील ठेवला पाहिजे आणि ठेवणार. तत्पुर्वी आजच्या सभेचे कामकाज सुरु करावे या विषयी आणि एक विषय पुर्ण झाल्यानंतर आदरणीय महापौर मॅडम यांनी त्या पत्रकार महोदयांना बोलावून त्यांच्या विषयी त्यांच्या काही सुचना असतील आणि त्यांनी मागचे पिठासीन अधिकारी या नात्याने त्या

आश्वासित केलेल्या असतील त्याबद्दल चर्चा घडवुन आणावी आणि चर्चा घडवून आणल्यानंतर आपण ह्याच्यातून चांगला मार्ग काढावा. कारण सन्मा. सदस्य जयंत पाटील आपली जी सुचना आहे ती सुचना योग्य आहे. आपली भावना ही योग्य आहे. या भावनेशी आम्ही सहमत आहोत. कारण पत्रकार महोदय, आजपर्यंन्त या आपल्या विकासाच्या कामामध्ये खांद्याला खांदा लावून ते आपल्याबरोबर आहेत आणि त्यांना बसण्याचे योग्य स्थान मिळाले पाहिजे. प्रशासनाच्या काही अडचणी असतात. मघाशी सभागृहामध्ये सभागृहनेत्यांनी उल्लेख केला की, आसनाच्या सिटींग अरेंन्जमेंन्टमुळे जो मागच्या वेळी प्रकार झाला त्यामुळे सिटींग अरेंन्जमेंन्ट आपण बदली केल्या. त्यामुळे अधिकाऱ्यांना केबीनची आवश्यक बाब होती. ती आपण ती केलेली आहे. त्यानंतर तो प्रश्न उद्‌भवलेला आहे. तरी पिठासीन अधिकाऱ्यांनी जे मागच्या वेळी आश्वासित केले आहे ते आणि या चर्चेमध्ये आज सदस्यांनी जो भाग घेतलेला आहे त्याचा पूर्णपणे विचार करुन आपण या कामकाजानंतर पहिला आपला विषय उपमहापौरांची निवडणुक आहे. या विषयानंतर आपण कृपया त्यांना बोलावून हा प्रश्न सोडवावा आणि मी सन्मा. सदस्य जयंत पाटील यांना विनंती करतो, हा विषय नाही आहे. मी त्यांना रिक्वेस्ट करतो की, आपण अशा पद्धतीने करुन घेतले तर आपला एक विषय पूर्ण होईल आणि जो दुसरा विषय सर्वांशी निगडीत आहे, त्यांच्या विषयी आपल्या सगळ्यांच्या चांगल्या भावना आहेत. पत्रकार महोदय हे आपले चांगले मित्र आहेत. ठिक आहे, आपल्या काही चुका होत असतात. त्या ते प्रामुख्याने दाखवितात. आपण त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यायला पाहिजे आणि ते धन्यवादास पात्र आहेत म्हणून कृपया आपण हा विषय पुर्ण करुन घ्यावा अशी मी महापौर मॅडमना विनंती करतो. धन्यवाद.

**परशुराम पाटील :-**

अध्यक्षांच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य जयंत पाटील यांचा जो विषय, पत्रकार बंधुंचा आहे तो अक्षरशः बरोबर आहे आणि आता ज्या जागेवर आपले अधिकारी बसतात त्याच जागेवर पत्रकार बसत होते. तर त्या पद्धतीने आजच्या सभेसाठी आपण त्यांना तिथे का खुची मांडून बसू नये? आजच्या सभेपुरते त्यांना ठेवण्यांत यावे आणि त्याच्यानंतर आपण त्यांना बोलावून त्यांचा विचार करण्यांत यावा. त्यांना केबीन द्यावी. तसेच, आपल्या येथे व्यासपीठावर जे आपले अधिकारी बसलेले आहेत. तर मला तरी असे वाटते आयुक्त, महापौर साहेब, उपमहापौर साहेब, सचिव यांनी त्या व्यासपीठाचा वापर करावा आणि जे काही अधिकारी बसलेले आहेत त्यांनी त्या व्यासपीठाचा वापर करु नये अशी माझी तुम्हांला विनंती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम, हा जो आता विषय उपस्थित झालेला आहे. मागच्या सभेला मी स्वतः हजर होतो. तत्कालीन उपमहापौर यांनी पत्रकारांच्या बाबतीत जो निर्णय घेतला तो धरणाला बसलेले असतांना सभागृहाच्या बाहेर जाऊन घेतलेला आहे. त्यांनी त्या सभेनंतर जो निर्णय घेतल्यानंतर प्रशासनाने त्यांना काही आश्वासन दिले आहे का? आपण त्यांना काही लेखी आश्वासन दिले आहे का? जर दिले नसेल तर मग का दिले नाही? काही अडचण होती का? आणि राहता राहिला जागेचा प्रश्न. पत्रकार हे या लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत. हे निर्विवाद म्हणजे काही बोलण्याचा दृष्टीकोन नाही आहे. पण या सभागृहातील कोणीही नगरसेवक, अधिकारी यांना असे वाटू नये की, त्यांनी इथे बसू नये. पण आज या सभागृहामध्ये आम्ही सर्व नगरसेवक निवडून आलो. आयुक्त साहेब, इकडे आमच्या सदस्य संख्येला माफदंड लावला गेला की, बसण्याची आसन व्यवस्था कशी असावी? माझी अशी सुचना आहे की, आता यापुढे पण काही अधिकारी वर्ग वाढणार आहेत. हे हाऊस आपल्याला कमी पडणार आहे. बसायची अरेन्जमेंन्ट थोडी कमी पडेल. कारण नगरसेवकांच्या जागेत म्हणजे बेन्चेसमध्ये आता यापुढे आपण वाढ करु शकतो असे मला वाटत नाही किंवा ते कमी करु शकतो की, आपला तिकडे अधिकारी वर्ग बसेल. जशी आम्हा नगरसेवकांच्या पक्षीय बलाबलीनुसार तुम्ही आम्हांला बसायची व्यवस्था केली तशी आता त्यांची आपण आसन व्यवस्था निर्माण केलेली आहे. सचिव आणि आयुक्त साहेब, तुम्हांला खास करुन माझी विनंती आहे की, याच्यातील तोडगा आपण लवकरात लवकर काढला पाहिजे. कारण ही अशी दुसरी सभा झालेली आहे. ती जागा सदस्य संख्येनुसार अपुरी पडते का? त्याच्यामध्ये एकूण किती पत्रकार बसू शकतात? कारण जसे पत्रकार महत्वाचे आहेत तशीच इकडची जनता जी आमची मतदार आहे त्यांनासुद्धा ती जागा महत्वाची आहे. इथे लोकांनी येऊन बघितले पाहिजे की, तिकडे आपल्या शहराचा कारभार आमचा लोकप्रतिनिधी कसा चालवतो? तो काय भुमिका घेतो? जनतासुद्धा तेवढीच रिस्पॉन्सीबल आहे. पत्रकारांनी दिलेली बातमी जनता वाचते आणि ते जागरुक असतात. जे आपल्या प्रशासनाचे काय चालले आहे. याच्यात त्यांना एक इन्टरेस्ट असतो की, प्रशासन कसे चालते आहे? ती लोक

आपल्याकडे सभेला आलेली असतात. त्यांच्यासुद्धा जागेचा आपण विचार केला पाहिजे. त्यांना आपण जागा दिलेली आहे. तसेच मी परत एकदा सांगतो की, ही आपण सदस्य संख्या ठरवा. पंचवीस पत्रकार आहेत का? तीस आहेत का? मग त्याच्यातील अधिकृत पत्रकार कोण? तुमच्याकडे लिस्ट आलेली आहे. तर जरुर प्रशासनाने विचार करुन त्यांची आसन व्यवस्था वाढवावी. जर असेल तर तसे आपण काहीतरी एकदा लेखी कळवून त्यांचा निकाल काढावा म्हणजे तिसरी सभा अशी प्रॉब्लेममध्ये येणार नाही. आमचा वेळ वाया जाणार नाही. पत्रकारांचा वेळ वाया जाणार नाही. आपलासुद्धा प्रशासनाचा वेळ वाया जाणार नाही. अशी मी आपल्याला, सभागृहाला विनंती करतो.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, लोकशाही प्रतिनिधीतील चौथा स्तंभ म्हणजे पत्रकारिता आणि पत्रकार हे पत्र नसतात, मित्र असतात आणि मी पुर्वी पत्रकार होतो. त्यामुळे पत्रकारांना सन्मानाने बोलावले पाहिजे आणि मी अशी विनंती करतो की, मा. साहेबांच्या वतीने सन्मा. सभागृह नेते आणि सन्मा. विरोधी पक्ष नेते या दोघांनी एकत्र जाऊन पत्रकारांना या ठिकाणी सन्मानाने पाचारण करण्यांत यावे.

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम, मी आपल्या परवानगीने बोलू इच्छितो. गेल्या वेळी आपले माजी उपमहापौर सन्मा. श्री. सय्यद मुझफ्फर हुसेनजी या विषयावर आम्ही बोलू इच्छित होतो पण आम्हांला बोलू देत नव्हते. त्यांनी सांगितले हा सब्जेक्ट आजच्या विषयपत्रिकेवर नाही आहे. त्यावेळी पण आमची विनंती होती. पण त्यांनी आम्हांला बालू दिले नाही. आज आपण आम्हांला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली की, पत्रकार हा संविधानाचा चौथा स्तंभ आहे. दे आर फोर्थ पिलर ऑफ दी कॉन्स्टीट्युशन ऑफ दी इंडीया. त्यांनी सगळ्यांच्या समोर जी क्लिअरिटी आहे. जे सभागृहामध्ये होते ते लोकांपर्यन्त पोहोचवणारे पत्रकारच असतात. जे काही या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये चांगले होत आहे, जे वाईट होत आहे. छोट्या छोट्या बातमीवरुनदेखील लोक एल.ए.क्यु. करतात. लोक चांगल्या चोगल्या बातमीवरुन त्याचे कटींग काढून ठेवून कितीतरी आपण परिवर्तन बघितले. अशा परिस्थितीमध्ये असतांना माझी अशी विनंती आहे की, जवळ जवळ दीड महिना होत आला, गेली महासभा ५ जूनला झाली होती. आपण एक वेळाही त्यांना पत्रकारांच्या पदाधिकाऱ्यांना बोलावले नाही. लेखी पत्र देऊन बोलावले नाही. आपण त्यांना बोलावणे हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य होते. म्हणजे ही प्रशासनाची जबाबदारी होती. त्या लोकांनी आपल्याला लेखी पत्र दिलेले आहे. पण मला त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी असे सांगितले की, आम्हांला दिड महिन्यामध्ये कोणी लेखी पत्र देऊन सभेलादेखील बोलावले नाही. ही जबाबदारी प्रशासनाची होती. आपण ती जबाबदारी घेतलेली होती. ती जबाबदारी करस्पॉन्डन्स माध्यमातून आपण त्यांना इन्व्हाईट केले पाहिजे होते. त्यांच्या काय अडीअडचणी त्या सोडविल्या पाहिजे होत्या. तसे काही झाले नाही आहे. आता बघा या पुढच्या जागेवर आपण बसण्याची व्यवस्था दोन वर्षानंतर बरोबर केली. ही जागा आता रिकामीच राहणार आहे. आता आपले इन्टेरिअर डेकोरेटर वगैरे आहेत. आपले आर्किटेक्ट आहेत त्यांच्याशी या विषयावर आपण व्यवस्थित चर्चा केली तर निघु शकते. प्रत्येक पक्षाच्या गटनेत्यांना बोलवा. जे पत्रकारांचे प्रतिनिधी आहेत त्यांना बोलवा आणि मग त्या कप्प्यामध्ये बसलेले नगरसेवक पण त्या लोकांना दिसले पाहिजे आणि पब्लिकलादेखील वाटले पाहिजे की, कुठे आपला नगरसेवक बोलत आहे? काय बोलतो आहे? आता तर आम्ही कुठे कानाकोपऱ्यांत असला तरी आमच्या काही नगरसेवकांचे आवाज ते ओळखतात. पण काही नगरसेवक अजनू दोन वर्ष झाली तरी बोलत नाहीत. ते शिकले पाहिजेत अशी आमची इच्छा पण असते. पण क्लिअरिटी नाही आहे. आपल्या घरी आपण जर बातम्या किंवा पिक्चर बघत असलो आणि जर मध्ये कोण आले की, आपण बोलतो जरा बाजूला हो. आता ते बिचारे कोणाला बोलणार की, बाजूला हो. मध्ये एवढी मोठी पिलर आहे. ह्या सगळ्या अडीअडचणी पत्रकारांच्या दृष्टीकोनातून फार महत्वाच्या आहेत आणि ट्रान्सफरन्सी पाहिजे, क्लिअरीटी पाहिजे. प्रत्येक सोयी पाहिजेत. कित्येक मोठ्या संख्येने तर आपले जे मतदार बाहेर उभे आहेत जे या भागाचे नागरीक आहेत. ते तर आठ-नऊ-दहा तास उभे असतात. त्या ठिकाणी पाण्याची देखील सोय नाही आहे. तर बाहेर तरी अशी एक वॉटर कुलरची व्यवस्था करा की, त्यांना पाणी तरी मिळेल. बसायची तरी सोय करा. कमीत कमी अशी सोय करा की, त्या ठिकाणी बेंच ठेवले तर आठ बेंच बसायचे असेल तर लोक त्या ठिकाणी ॲडजेस्ट करुन दहा बसतील. खुची ठेवली की, त्याच्यात ॲडजेस्ट होत नाही. आपण बघता की, सार्वजनिक दवाखान्यामध्ये बेंच असतात, ते दहा बेंच लावा. म्हणजे शंभर लोक बसतील ही माझी एक विनंती आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगी बोलतो, आजच्या ह्या प्रसन्न वातावरणात सभागृहामध्ये जिकडे तिकडे पहावे तिकडे फुलेच फुले आहेत आणि सभागृहाचे असे एक वातावरण प्रफुल्लित झालेले आहे. प्लॅस्टीकची असो पण एक चांगले वातावरण या सभागृहामध्ये आज दिसत आहे आणि आज हे सभागृह सुरु होत असतांना सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी एका पत्रकारांच्या मुद्यावर तहकुबीची सुचना घेतली. त्यांचेदेखील बरोबर आहे. मागच्या महासभेमध्ये वेळेला उपमहापौर ज्यावेळेला पत्रकारांनी बहिष्कार टाकला त्यावेळेला आपल्या सभागृहाने त्यांना सांगितले की, पत्रकारांनी आपल्यावर बहिष्कार टाकलेला आहे. आपण त्यांच्याशी दोन गोष्टी बोलून घ्या किंवा त्यांना कशा पद्धतीने तुम्हांला परत जागा करता येईल अशा पद्धतीने त्यांच्याशी बोलून घ्या. पण त्यांनी तो विषय ऐकून घेतला नाही आहे. हा विषय विषयपत्रिकेवर नाही आहे असे सर्व कारण सांगून तो विषय ठोकरुन दिला. त्याच्यानंतर बाहेर त्यांच्याशी काय गोष्टी झाल्या, लेखी काय झाले हेसुद्धा समजले नाही आहे. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. पत्रकारांचा आदर करणे हे सर्व सन्मा. लोकप्रतिनिधींचे काम आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये चालणारे विषय भले असो, बुरे असो. त्यांना वाचा फोडण्यासाठी चांगले विषय लोकापर्यंन्त पोहोचविण्यासाठी जे काही चुकले असेल त्यालासुद्धा वाचा फोडण्यासाठी पत्रकार हा सगळ्यात जवळचा पत्रकार आणि मित्रसुद्धा आहे. माझी मा. महापौरांना विनंती आहे आमच्या या सुचनेचा विचार करुन आपण पत्रकारांना योग्य ती आसन व्यवस्था करुन द्यावी. त्याचबरोबर तिथे पंखे किंवा त्या पद्धतीने आपल्याला हवेची यंत्रणा पुरविण्यांत यावी. तसेच आम्हांला ज्या स्थानावर ज्यांनी आम्हांला इथे बसवून दिलेले आहे, ते आमचे जनता जनार्दन त्यांच्यासुद्धा बसण्याची व्यवस्था तिथे पंखे किंवा ए.सी. ची व्यवस्था करण्यांत यावी अशी मी मा. महापौरांना विनंती करतो. धन्यवाद.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने, सभागृहाची विनंती आणि सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन आम्ही सभागृहाच्या निर्देशाप्रमाणेच संबंधित पत्रकार बंधुंना भेटलो आणि त्यांच्याशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला की, या आसन व्यवस्थेबद्दल तुर्त तुम्ही प्रशासनाला, शासनाला समजून घ्या. आता सन्मा. सदस्य रतन पाटील यांनीसुद्धा तशाच स्वरुपाची भावना व्यक्त केली आहे. मी ती मुद्दामहून लिहून घेतली की, योग्य ती आसन व्यवस्था करावी असे ते म्हणत आहेत. तर आयुक्त साहेब, हा जो लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे हा काही आपल्याला खिळखिळा करायचा नाही. तो अधिक मजबूत कसा होईल? वाढेल कसा? आणि त्यातून या शहराची सम्य आणि चांगले चित्र जनमाणसापुढे प्रसिद्धीच्या माध्यमातून कसे जाईल? यासाठी आपल्या सभागृहाच्या आजूबाजूला पत्रकार मंडळींना मानाचे स्थान देणे आवश्यक होईल. म्हणून आपण आम्हांला आणि सभागृहाला आणि सभागृहाच्या माध्यमातून एक आश्वासन द्या की, या सर्व पत्रकारांना योग्य रित्या योग्य ठिकाणी बसविण्याची आपण प्रशासनातर्फे व्यवस्था कराल.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मघासपासून जो पत्रकरांचा विषय तहकुबीच्या स्वरुपात आला. सभागृहाच्या कामकाजाच्या दृष्टीने जो विषय आणला गेला आणि ज्यावेळी चर्चा झाली. हे सभागृहाचे महत्व लक्षात घेता गेल्या वेळी पिठासीन अधिकारी कोण होते? ते उपमहापौर होते. महापौर होते. अशी त्यांची व्याख्या होऊ शकत नाही आणि आता ते उपमहापौर नाही आहेत. म्हणून उपमहापौरांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु व्हायची आहे. त्याच्या आधी ही तहकुबी आलेली आहे. एक तर पहिल्यांदा सभागृहाचे महत्व लक्षात घेता त्यावेळी आम्ही सभागृहात अत्यंत पोटतिडीकीने हा विषय मांडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तो सभागृहाच्या पटलावर घेण्यात येणार नाही. अशा पद्धतीने त्याचे उत्तर आले होते. ती अत्यंत गंभीर बाब होती. पत्रकारांनी त्याची दखल काय घ्यायची ती घेतली असेल. पण तो महत्वाचा विषय होता. तो आमचा ऐकून घेतला नाही. तरी तुमच्या लक्षात आले होते. हे फक्त त्या वेळेच्या पिठासीन अधिकाऱ्यांचे काम होते. ते एकट्याचेच नव्हते तर त्यावेळी असलेले आयुक्त साहेबांचेदेखील ते काम होते की, या सभागृहामध्ये त्यांच्यावर कळत नकळत ज्या काही प्रतिक्रिया किंवा जी आश्वासने दिली आहेत त्याचे एक्झीक्युशन होणे हे जरुर होते. पण त्या दिवसापासून आज तहकुबी येईपर्यंत त्याच्यावर कोणतीही चर्चा नाही आणि आता सभागृह नेते, सन्मा. सदस्य आसिफ शेख विनंती करतात. सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते उठतात, जातात, परत हसत येत नाहीत, खाली मान घालून येतात. त्यांचे काय बोलणे झाले? आमची, या सभागृहाची, सगळ्यांचीच इच्छा राहिल की, पत्रकारांना सन्मानाने बसवावे. योग्य ठिकाणी बसवावे. त्यांना योग्य जागेची दखल

घ्यावी.  तशा सगळ्या सुचना आलेल्या आहेत.  त्याच्यावर पंधरा मिनिटाचे भाषण करण्याची काहीही आवश्यकता नाही आहे.  पण नकळत जेव्हा अशा घटना घडतात आणि सभागृहाची अत्यंत महत्वाची वेळ त्याच्यातून जाते की, त्याच्यातून वेगळा मॅसेज जाऊ शकतो आणि मॅसेज जाण्यासाठी हे प्रशासन किंवा पिठासीन अधिकारी यांची जबाबदारी आहे.  आमची जबाबदारी नव्हतीच.  आम्ही मांडत होतो. तुम्ही ऐकले होते.  ज्यांना ऐकायचे होते त्यांनी ऐकून घेतले नाही.  तुम्ही तर नक्कीच ऐकले होते. कारण प्रशासनाने त्या कामकाजामध्ये विरोध केला होता.  पिठासीन अधिकाऱ्यांनी विरोध केला नव्हता. पण पिठासीन अधिकाऱ्यांच्या कामकाजावर आलेली जबाबदारी ही प्रशासनाचीच आहे असे मी मानतो आणि त्यामुळे आजच्या घटकेला गोड निट की पुन्हा पत्रकारांचा हा वादविवादाचा विषय जर खरोखरच अशक्य आहे.  तर त्याची पार्श्वभुमी पटवून सांगा.  सभागृहाचेदेखील मत पटले पाहिजे.  त्या पत्रकारांनाही पटले पाहिजे.  पण पुन्हा पुन्हा सभा चालू होते वेळी किंवा कदाचित सभा होते वेळी जरी विषय नसता आला तरी पत्रकारांच्या मागणीची दखलच घेतली नाही किंवा दिलेल्या आश्वासनाची या सभेत चर्चा झाली होती आणि नंतर उत्तर दिले होते की, त्यांची अशी बोलणी झालेली आहे.  हे जे उत्तर होते ते अगदी महत्वाचे आहे.  त्यावेळी पिठासीन अधिकाऱ्यांनी उत्तर दिले होते की, आपले उपायुक्त आणि अधिकारी त्यांच्याशी चर्चा करतात असे प्रोसिडींगला आहे.  ती चर्चा काय ती ही सभागृहापुढे आली नाही.  आमचे मत आहे, हा वादविवादाचा विषय न होता, मानपानाचा विषय न होता सन्मानित तोडगा काढा आणि सभागृहाचे कामकाज चालवा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदया आणि सन्मा. सदस्य, पत्रकारांच्या बैठक व्यवस्थेवरुन या ठिकाणी जी सांगोपांग चर्चा झालेली आहे ती तहकुबीचीच सुचना सन्मा. सदस्य पाटील साहेबांनी या ठिकाणी मांडलेली आहे.  याची सुरुवात कशी झाली?  हे का करावे लागले?  या संदर्भात पुष्कळ चर्चा सभागृहामध्ये झालेली आहे.  वास्तविक पत्रकारांच्या बैठकीची व्यवस्था नाही असा जो एकंदर समज या ठिकाणी केला जातो आहे.  त्याच्यात मी थोडीशी दुरुस्ती करु इच्छितो.  पत्रकारांच्या बैठकीची व्यवस्था ही वेगळी करण्यांत आलेली आहे आणि ती लिखीत करण्यांत आलेली आहे.  ही बैठक व्यवस्था पुरेशी आहे की, अपुरी आहे हा एक चर्चेचा विषय होऊ शकतो.  बैठक व्यवस्थाच नाही अशा प्रकारचे तर चित्र नक्कीच नाही आहे.  ज्यावेळी हा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळी मी त्यांच्याशी चर्चा केलेली आहे आणि त्यांना सांगितले की, नक्कीच तुमचे पत्रकार किती असतात?  या ठिकाणी किती उपस्थित राहतात?  त्यानुसार आपल्याला जर वाटले की, जागा अपुरी आहे.  तर आपण नक्की पाठीमागे जो काही मोकळा भाग उरलेला आहे.  आता जी शहर विकास आघाडीची नवीन बैठक इकडे बसण्याची व्यवस्था केल्यामुळे आपल्याला या ठिकाणी काही भाग मिळतो आहे.  तेव्हा इन्टेरिअर डेकोरेटरला बोलावून आम्हांला आणखी मोठी व्यवस्था करता येईल का?  या दृष्टीनेदेखील आमच्या डोक्यामध्ये तो विचार होता.  परंतु, असा एक व्ह्यु घेतला गेला की, आम्हांला पुर्वीची जी व्यवस्था होती तीच व्यवस्था पाहिजे.  आता असा प्रश्न आहे की, जो अधिकारी वर्ग पुर्वी इथे बसत होता त्या आपल्या अधिकारी वर्गाला तिकडे पाठीमागे बसावे लागत आहे.  तिथेदेखील अपुरी बैठक व्यवस्था आहे.  इकडे आपण जनतेकडे पाहायला गेलो तर त्यांना धडपणाने उभे राहायला पण जागा नाही.  मला अनौपचारिकरित्या जे समजले.  मला अजून नक्की लेखी काही माजी उपमहापौर मुझफ्फर हुसेन साहेबांनी जे त्यांना प्रॉमिस दिलेले आहे त्या संदर्भात मला अजूनही लेखी काही कळविण्यांत आलेले नाही.  कदाचित निवडणुकीच्या कामकाजामध्ये दरम्यानच्या काळामध्ये व्यस्थ होते.  त्यामुळे ती चर्चा होऊ शकली नाही.  परंतु, मी नक्की त्यांच्याशी चर्चा करतो की, त्यांनी पत्रकारांना काय आश्वासन दिलेले आहे.  परंतु, या सगळ्याचा विचार करीत असतांना आणि इकडे आपण जर प्रेक्षक गॅलरीकडे पाहिले तर भयानक चित्र आहे.  त्या ठिकाणी उभे राहायलादेखील जागा नाही अशी परिस्थिती आहे. तेव्हा या परिस्थितीत एकच तोडगा शिल्लक राहतो.  तो म्हणजे जी उर्वरित जागा आहे त्या जागेमध्ये व्यवस्थित नियोजन करुन जर बैठक व्यवस्था त्यांना अपुरी वाटत असेल तर ती आपल्याला वाढवून देता येईल.  अधिकाऱ्यांची देखील व्यवस्था करता येईल.  त्यांचीदेखील व्यवस्था करता येईल.  तर मी या सभागृहाला सांगू इच्छितो की, ही सभा संपल्यानंतर मी पुन्हा पत्रकारांच्या बरोबर बसतो आणि जर ही व्यवस्था त्यांना मान्य असेल, त्यांचे जितके पत्रकार आहेत तितक्या पत्रकारांची बसण्याची व्यवस्था झाली पाहिजे.  फक्त एवढाच प्रश्न असला पाहिजे.  हा प्रश्न प्रतिष्ठेचा नसला पाहिजे.  बैठक व्यवस्थाच करायची आहे तर ती व्यवस्था करण्याचे प्रशासन नक्की आश्वासन देते आणि आम्ही त्याप्रमाणे नक्की करु.  माझी पत्रकार बंधुंना विनंती आहे की, त्यांनी हा बहिष्कार मागे घ्यावा आणि

आपले वृत्तसंकलनाचे कामकाज सुरु करावे. ज्या जागेमध्ये त्यांना नेमून दिलेले आहे त्या जागेमध्ये सद्यस्थितीत कामकाज सुरु करावे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. आपण सुरुवातीला जे सभागृह बनविले. त्याच्यामध्ये डाव्या हाताला असलेले म्हणजे आपल्या उजव्या हाताला असलेले हे आपण पत्रकारांसाठीच कक्ष बनविले आहे. आपले जे डिझाईन आहे ते पत्रकारांसाठीच बनविले. परंतु आपल्या प्रशासनातर्फे त्याच्यावर अतिक्रमण झालेले आहे. म्हणजे अतिक्रमण विभागसुद्धा तिकडे काहीच करु शकत नाही. असे म्हणतात की, राजाने मारले आणि पावसाने झोडपले तर तक्रार कोणाकडे करायची. आता तिकडे तक्रारच करता येत नाही. आतासुद्धा आपले अधिकारी इकडे बसलेले आहेत. आता मतदानाची प्रक्रिया होणार असल्यामुळे इकडे जेवढे बसले तेवढे राहू शकतात आणि जर आपण ते अधिकारी या तऱ्हेची मांडणी करुन इकडे आणू शकतो. हे आपल्या लक्षात येईल. त्यामुळे इकडे कुठल्याही तऱ्हेची अडचण होणार नाही. आपण पत्रकारांना सन्मानाने बोलवा. त्यांना आजच्या दिवस बसायला सांगा. म्हणजे आपला जो काही इकडचा निर्णय होईल, जे काही सभागृहाचे कामकाज होईल त्याची योग्य तऱ्हेने बातमी महाराष्ट्रामध्ये निश्चितच कळेल आणि पत्रकारांना आपण एक मानाची वागणूक दिली अशा तऱ्हेचे चित्र दिसून येईल.

**मा. आयुक्त :-**

आपल्या सुचनेचा आम्ही सन्मान करु.

**जयंत पाटील :-**

मी सुद्धा माझ्यातर्फे पत्रकारांना विनंती करतो की, आपण जो काही निर्णय घेतलेला आहे तो निर्णय आपण कृपया मागे घ्या. आपल्याशी चर्चा करायला आयुक्त साहेब आणि महापौर मॅडमसुद्धा तयार आहेत. तेव्हा मी त्यांना माझ्यातर्फे विनंती करतो की, आपण आपल्यासाठी मांडलेल्या तहकुबीच्या सुचनेचा योग्य तऱ्हेने मान राखला गेलेला आहे. मी माझी सुचना सभागृहाच्या वतीने मागे घेत आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १६ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम १९(५) अन्वये उपमहापौरांच्या प्रक्रियेला सुरुवात होत आहे. उपमहापौर पदासाठी दोन उमेदवार आहेत.

(१) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी,

(२) वैती चंद्रकांत सिताराम.

एका पदासाठी दोन उमेदवार असल्यामुळे या पदाकरिता निवडणुक घेणे क्रमप्राप्त झाले आहे.

(उपमहापौर पदाकरिता मतदान प्रत्रिका नमुना ह्या पद्धतीमधे आहे. सदर मतपत्रिकेवर मागील बाजूस सुचना आहेत. मतपत्रिकेच्या सुचनेची माहिती श्री. हरेश पाटील, सचिव, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सभागृहात दिली.)

(मतपत्रिकेवरील मतदानासंबंधीच्या सुचना सदस्यांना वाचून दाखविल्या.)

**मिलन म्हात्रे :-**

मा. निवडणुक अधिकारी ही निवडणुक प्रक्रिया चालू होण्या अगोदर ज्या ज्या पक्षांनी आपले आपले विप दिलेले आहेत त्याचे वाचन झालेले नाही. आमचे पक्षादेश आपल्याला मिळाले का? राजकीय पक्षांनी ज्यांनी ज्यांनी विप काढले त्याचे आदेश आपल्याकडे आले का?

**मा. आयुक्त :-**

हा प्रशासनाचा भाग नाही आहे. तो तुमच्या राजकीय पक्षाच्या इंटरनल व्यवस्थेचा भाग आहे. तो इलेक्शन प्रक्रियेचा भाग असू शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पण आम्ही आपल्याला दिलेले आहे. त्याची कॉपी मिळाली का?

**मा. आयुक्त :-**

कॉपी मिळालेली आहे.

(मा. उपमहापौर पदासाठी मतदान प्रक्रिया सुरु करण्यांत आली.)

**हेमंत पाटील :-**

मा. उपमहापौर पदासाठी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेला सुरुवात होत आहे. एकूण ७८ सन्मा. सदस्यांनी मा. उपमहापौर पदासाठी मतदान केले.

(मा. उपमहापौर पदासाठी मतदान प्रक्रिया संपल्यानंतर मतमोजणी करण्यांत आली.)

| | |
|---|---|
| मतमोजणी केली असता एकुण मते | ७८ |
| वैध मते | ७८ |
| श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | २१ |
| श्री. वैती चंद्रकांत सिताराम | ५७ |

**मा. महापौर :-**

उपमहापौर पदासाठी मतदान घेतले असता श्री. वैती चंद्रकांत सिताराम ह्यांना सर्वाधिक म्हणजे ५७ मते मिळाल्याने ते मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपमहापौरपदी निवडून आल्याचे मी जाहिर करते. उपमहापौर यांची मुदत विद्यमान महापौर यांच्या मुदती बरोबर समाप्त होईल.

(मा. सचिव श्री. वैती चंद्रकांत सिताराम यांना उपमहापौर पदी आसनस्थ करतात. श्री. वैती चंद्रकांत सिताराम ह्यांचे सभागृहामध्ये मान्यवर पुष्पगुच्छ व पुष्पहार देऊन अभिनंदन करतात. प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्त उपमहापौरांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व सत्कार करतात.)

**प्रकरण क्र. १६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम १९(५) अन्वये उपमहापौर पदासाठी निवड करणे.

**ठराव क्र. :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम १९(५) अन्वये उपमहापौर रिक्त पदी नेमणूक करणेकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता दोन सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली ती अशी :-

१) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
२) वैती चंद्रकांत सिताराम

नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या तारखेस व वेळेस उपरोक्त सदस्यांनी दोहोंपैकी एकाने कोणीही उमेदवारी मागे घेतली नाही. म्हणून उपमहापौर पदासाठी निवडणूक लढविणेस दोनच उमेदवार आहेत. उपमहापौर पद हे एकच पद असल्याने उमेदवार दोहोंपैकी एकाची निवड करण्यासाठी गुप्त मतदान घेतले असता, १) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी २१ मते व २) श्री. वैती चंद्रकांत सितराम ह्यांना ५७ एवढी मते मिळाली. सर्वात जास्त मते **श्री. वैती चंद्रकांत सिताराम** यांना मिळालेली आहेत. म्हणून **श्री. वैती चंद्रकांत सिताराम** हे उपमहापौरपदी जास्त मताने निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे. सदर उपमहापौर यांची मुदत विद्यमान महापौर यांच्या मुदती बरोबर समाप्त होईल.

**ठराव मतदानाद्वारे मंजुर**

**सही/-**
**महापौर/पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सचिव साहेबांनी पुढचा विषय घ्यावा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १७ चे वाचन केले.)

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम, नगरसचिव साहेबांनी प्रकरण क्र. १७ वाचलेले आहे. आपण मतदान प्रक्रिया सुरु करावी.

**मा. महापौर :-**

मतदान प्रक्रिया सुरु करावी.

**प्र. सचिव :-**

प्रक्रिया सुरु होईपर्यंत अकरा उमेदवार होते. आता लिला गुरुनाथ पाटील यांची उमेदवारी मागे घेण्याबाबतचा अर्ज माझ्याकडे आलेला आहे. आता एकूण दहा उमेदवार राहिलेले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

आता एकूण दहा उमेदवार राहिलेले आहेत. तर आपण आता प्रत्येक मतदाराचे नांव वॉर्डवाईस कॉल आऊट करा. याच्यामध्ये अजिबात वेळ घेऊ नका. ४ वा. १२ मि. झालेली आहेत.

**मा. महापौर :-**

अजून अर्ज मागे घेणारे कोण आहे का?

**रोहित सुवर्णा :-**

या ठिकाणी पत्र आले तरच ते मागे घेतले जाईल. आपण असे अनाऊन्स करायचे नसते.

**मा. महापौर :-**

डोन्ट टेक टेन्शन.

**रोहित सुवर्णा :-**

नो. वुई आर नॉट इन हरी ऑल्सो. बट वेदर सबमिटेड दी लेटर.

**प्र. सचिव :-**

आता एक उमेदवारी मागे घेण्याबद्दल माझ्याकडे अर्ज आलेला आहे. श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे ऊर्फ पुजा प्रताप शिंदे यांनी आता आपली उमेदवारी मागे घेतलेली आहे.

**रोहित सुवर्णा :-**

आता एकूण नऊ उमेदवार राहिलेले आहेत.

**प्र. सचिव :-**

आता राहिलेल्या उमेदवारांची यादी मी वाचून दाखवितो.

१) श्री. घरत केशव रामभाऊ
२) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
३) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
४) श्री. पाटील मिलन गोविंदराव
५) श्री. पाटील प्रेमनाथ गजानन
६) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
७) श्री. म्हात्रे मिलन वसंत
८) श्री. पाटील मोहन मधुकर
९) श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव

मतपत्रिकेवर ज्यांची नांवे छापली आहेत. पण ज्यांनी नांवे मागे घेतलेली आहेत त्यांना मतदान करण्याचा प्रश्न येत नाही.

(मतपत्रिकेवरील मतदानासंबंधीच्या सुचना सदस्यांना वाचून दाखविल्या.)

**हेमंत पाटील :-**

मा. स्थायी समिती सदस्य पदासाठी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेला सुरुवात होत आहे. मतदान करण्यासाठी सभासदांची नांवे खालीलप्रमाणे उच्चारण्यांत येत आहे. तरी सन्मा. सदस्यांनी एक एकेकाने येऊन मतदान करावयाचे आहे.

**मा. महापौर :-**

माझ्या वतीने निकाल घोषित करा.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या वतीने प्रकरण क्र. १७, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ मधील नियम २०(५) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य निवृत्त होणार आहेत त्यांच्या जागा भरण्यासाठी नवीन सदस्यांची नेमणुक करणेबाबत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(५) अन्वये स्थायी समितीचे ८ सदस्य निवृत्त होणार आहेत. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत :-

**निवृत्त होणारे सदस्य.**

१. श्री. पाटील मोहन मधुकर
२. श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
३. श्री. कुरेशी याकुब इस्माईल
४. श्री. गावंड हरेश लक्ष्मण
५. श्री. चंद्रकांत सिताराम वैती

६. श्री. दिनेश द. नलावडे
७. श्री. पाटील शरद केशव
८. श्री. म्हात्रे मिलन वसंत

वरील निवृत्त होणारे सदस्यांच्या जागी नवीन आठ सदस्यांची नेमणुक करावयाची आहे. त्याकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता पुढे दर्शविल्याप्रमाणे खालील सदस्यांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती.

१) श्री. केशव रामभाऊ घरत
२) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
३) श्रीम. ज्योत्स्ना जालींदर हसनाळे
ऊर्फ
सौ. पुजा प्रताप शिंदे
४) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
५) श्री. पाटील मिलन गोविंदराव
६) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
७) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
८) श्री. मिलन वसंत म्हात्रे
९) श्री. मोहन मधुकर पाटील
१०) श्रीम. लिला गुरुनाथ पाटील
११) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर
१२) श्री. याकुब इस्माईल कुरेशी

वरील सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याच्या तारखेस व वेळेस श्री. याकुब कुरेशी यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतल्यामुळे निवडणुक लढविणारे ११ सदस्य शिल्लक राहिले होते. परंतु निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर (१) सौ. ज्योत्स्ना हसनाळे व (२) सौ. लिला पाटील या २ सदस्यांनी माघार घेतल्यामुळे ९ उमेदवार बाकी राहीले व स्थायी समिती सदस्य पदी ८ (आठ) सदस्यांची निवड करणे असल्याने मतदान घेण्यांत आले. गुप्त मतदान घेतले असता खालीलप्रमाणे प्रत्येक सदस्यास मते मिळाली.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १ | केशव रामभाऊ घरत | ६४ |
| २ | जानी कैलासबेन दिनेशचंद्र | ७६ |
| ३ | पाटील प्रभात प्रकाश | ७२ |
| ४ | पाटील मिलन गोविंदराव | ६४ |
| ५ | प्रेमनाथ गजानन पाटील | ६८ |
| ६ | भोईर गजानन लक्ष्मण | ७६ |
| ७ | मिलन वसंत म्हात्रे | ४८ |
| ८ | मोहन मधुकर पाटील | ९२ |
| ९ | सुर्यकांत अनंतराव भोईर | ६४ |

वरील ज्या उमेदवारांना जास्त मते मिळाली आहेत त्या आठ उमेदवारांची नावे अशी :-

१) श्री. केशव रामभाऊ घरत.
२) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र.
३) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश.
४) श्री. पाटील मिलन गोविंदराव.
५) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील.
६) श्री. भोईर गजानन लक्ष्मण.
७) श्री. मोहन मधुकर पाटील.
८) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर.

याप्रमाणे स्थायी समिती पदावर ८ (आठ) सदस्य बहुमताने निवडून आल्याचे मा. महापौरांच्या वतीने मी घोषीत करीत आहे.

(निवडून आलेल्या आठ स्थायी समिती सदस्यांचे मा. महापौर यांनी प्रशासनाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यांत आले.)

**प्रकरण क्र. १७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ मधील नियम २०(५) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य निवृत्त होणार आहेत त्यांच्या जागा भरण्यासाठी नवीन सदस्यांची नेमणुक करणे.

**ठराव क्र. :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम २०(५) अन्वये स्थायी समितीचे ८ सदस्य निवृत्त होणार आहेत. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत :-

१. श्री. पाटील मोहन मधुकर
२. श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
३. श्री. कुरेशी याकुब इस्माईल
४. श्री. गावंड हरेश लक्ष्मण
५. श्री. चंद्रकांत सिताराम वैती
६. श्री. दिनेश द. नलावडे
७. श्री. पाटील शरद केशव
८. श्री. म्हात्रे मिलन वसंत

वरील निवृत्त होणारे सदस्यांच्या जागी नवीन आठ सदस्यांची नेमणुक करावयाची आहे. त्याकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता पुढे दर्शविल्याप्रमाणे खालील सदस्यांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती.

१) श्री. केशव रामभाऊ घरत
२) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
३) श्रीम. ज्योत्स्ना जालींदर हसनाळे
ऊर्फ
सौ. पुजा प्रताप शिंदे
४) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
५) श्री. पाटील मिलन गोविंदराव
६) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
७) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
८) श्री. मिलन वसंत म्हात्रे
९) श्री. मोहन मधुकर पाटील
१०) श्रीम. लिला गुरुनाथ पाटील
११) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर
१२) श्री. याकुब इस्माईल कुरेशी

वरील सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याच्या तारखेस व वेळेस श्री. याकुब कुरेशी यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतल्यामुळे निवडणुक लढविणारे ११ सदस्य शिल्लक राहिले. परंतु निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणे अगोदर (१) सौ. ज्योत्स्ना हसनाळे व (२) सौ. लिला पाटील या २ सदस्यांनी माघार घेतल्यामुळे ९ उमेदवार बाकी राहीले व स्थायी समिती सदस्य पदी ८ (आठ) सदस्यांची निवड करणे असल्याने मतदान घेण्यांत आले. गुप्त मतदान घेतले असता खालीलप्रमाणे प्रत्येक सदस्यास मते मिळाली.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | मिळालेली मते |
|---|---|---|
| १ | केशव रामभाऊ घरत | ६४ |
| २ | जानी कैलासबेन दिनेशचंद्र | ७६ |
| ३ | पाटील प्रभात प्रकाश | ७२ |
| ४ | पाटील मिलन गोविंदराव | ६४ |
| ५ | प्रेमनाथ गजानन पाटील | ६८ |
| ६ | भोईर गजानन लक्ष्मण | ७६ |
| ७ | मिलन वसंत म्हात्रे | ४८ |
| ८ | मोहन मधुकर पाटील | ९२ |
| ९ | सुर्यकांत अनंतराव भोईर | ६४ |

वरील ज्या उमेदवारांना जास्त मते मिळाली आहेत त्या आठ उमेदवारांची नावे अशी :-

१) **श्री. केशव रामभाऊ घरत.**
२) **श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र.**
३) **श्रीम. पाटील प्रभात प्रकाश.**
४) **श्री. पाटील मिलन गोविंदराव.**
५) **श्री. प्रेमनाथ गजानन पाटील.**
६) **श्री. भोईर गजानन लक्ष्मण.**
७) **श्री. मोहन मधुकर पाटील.**
८) **श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर.**

**याप्रमाणे स्थायी समिती पदावर ८ (आठ) सदस्य बहुमताने निवडून आल्याचे मी घोषीत करीत आहे.**

**ठराव मतदानाद्वारे मंजुर**

**सही/-**
**महापौर/पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढचा विषय घ्यावा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १८ चे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

आलेल्या नावाचे वाचन करावे.

**प्रकरण क्र. १८ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे (संरक्षण व जतन) (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये १२ सदस्य व ३(३) अन्वये ०३ नामनिर्देशित सदस्य खालीलप्रमाणे एकूण १५ सदस्यांची नियुक्ती ही सर्वसाधारण सभा करीत आहे.

**वृक्षप्राधिकरण समिती सदस्य**

१) श्री. आयुक्त सो. — अध्यक्ष
२) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३) श्री. महेंद्रसिंग चौहाण
४) श्रीम. अनिता जयवंत पाटील
५) श्रीम. लिला गुरुनाथ पाटील
६) श्रीम. प्रियांका करंबेळे
७) श्री. अशोक पांडुरंग पाटील
८) श्री. मदन उदितनारायण सिंह
९) श्री. चंद्रकांत बी. मोदी
१०) श्री. ॲड. एस. ए. खान
११) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
१२) श्री. मिलन वसंत म्हात्रे

**नामनिर्देशित सदस्य**

१) श्री. एडवीन घोन्सालवीस
२) श्री. देहरकर शरद
३) श्री. राजेंद्र चांदमल मित्तल

वरील समितीवरील सदस्यांची मुदत एक वर्ष राहील व याबाबतची पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी अशी ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. लिओ कोलासो.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. प्र. सचिव, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**सायं. ०५.३० वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**